# 22 डिसेंबर

## आजचा सुविचार :

विचार करण्यासाठी वेळ द्या, कारण ते शक्तीचे उगमस्थान आहे.

## आजचे पंचांग :

वार – बुधवार
तिथी – मार्गशीर्ष
सुर्योदय – सकाळी 6.55 वाजता

दिनांक : 22 डिसेंबर 2021
नक्षत्र – पुष्य
सूर्यास्त – सायंकाळी 6. 07 वाजता

## आजचे दिनविशेष :

1) राष्ट्रीय गणित दिवस ( थोर गणित तज्ञ श्रीनिवास रामानुजन यांचा जन्मदिन – 22 डिसेंबर 1987 )

2) उत्तर गोलार्धात वर्षातील सर्वात छोटा दिवस

3) सूर्याच्या उत्तरायणास प्रारंभ

## आजचे इंग्लिश शब्द :

1) State – राज्य 2) Country - देश 3) Continent – खंड 4) World – जग

## आजची प्रश्नमंजुषा :

1) आपल्या शाळेचे नाव काय?

2) आयताला किती बाजू असतात?

3) दोन एकवर्षीय वनस्पतींची नावे सांगा.

4) आम्ल आणि अल्कली ओळखण्यासाठी सामान्यपणे कोण कोणती सुचके वापरतात?

## बोधकथा :

### मांजराच्या गळ्यात घंटा

एका किराणा मालाच्या दुकानात खूप उंदीर राहत होते. किराणा मालाचे दुकान असल्यामुळे त्यांना तिथे भरपूर खायला मिळायचे. धान्य, सुका मेवा, बिस्किटे आदी वस्तूंवर ते ताव मारायचे. अशा खादाड उंदरांमुळे दुकानदाराचे खूप नुकसान होत असे. दुकानदाराने विचार केला की या उंदरांचे काहीतरी करायलाच हवे. नाही तर एक दिवस मला कंगाल होण्याची पाळी येईल. हा विचार करत दुकानदाराने एक दिवशी एक मांजर दुकानात आणली. ती आल्यापासून उंदरांना काही आरामशीर फिरता येईना. मांजर आपली रोज उंदीर दिसला की त्यांना पकडून खायची. त्यामुळे उंदरांची संख्या झपाट्याने कमी होऊ लागली. उंदीर आता फार काळजीत पडले. त्यांनी मांजरीचा कायमचा बंदोबस्त करण्याचे ठरवले. त्यासाठी त्यांनी एक सभा बोलवली. सभेत याच्यावर वरीच चर्चा झाली. पण मांजराचा बंदोबस्त करायचा कसा हे कुणालाच समजेना. थोड्या वेळात एक हुशार उंदीर म्हणाला, मांजर अगदी हलक्या पायाने व अत्यंत चपळपणे फिरते. त्यामुळे आपल्यापैकी कुणालाच ती आल्याचे कळत नाही व त्यामुळे सतत

आपण तिच्या तावडीत सापडले जाण्याची भीती लागलेली असते. तेव्हा एक तरूण उंदीर म्हणाला की काही करून आपण मांजराच्या गळ्यात घंटा बांधली पाहिजे.

सगळ्या उंदरांना हा उपाय अगदी पटला. एक उंदीर म्हणाला की छान हं मांजर चालायला लागली की घंटा वाजेल आणि आपण सावध होऊन तिच्यापासून दूर पळून जाऊ. सगळे फार खुश झाले आणि उपाय सांगितलेल्या उंदरांला स्वत:च्या हुषारीचा फार अभिमान वाटला. तेवढ्यात एक म्हातारा उंदीर बोलला, थांबा हा वेडेपणा आहे. मला एवढेच सांगा मांजराच्या गळ्यात घंटा बांधणार कोण? तेव्हा सर्वजण एकमेकांकडे बघू लागले. तितक्यात मांजर तेथे आली व तिने एका उंदरावर झडप घातली.

उपदेश : अमलात न येणारा उपाय कुचकामी ठरतो

## श्रीनिवास रामानुजन माहिती

### सुरुवातीचे जीवन –

श्रीनिवास रामानुजन यांचा जन्म 22 डिसेंबर 1887 ला तामिळनाडूच्या कोइम्बतुर मधील इरोड गावात झाला. त्यांचे वडील श्रीनिवास अय्यंगर हे साड्यांच्या दुकानात मुनीम म्हणून काम पाहत असत.

त्यांची आई कोमल तम्मल ह्या एक गृहिणी असतानाच सोबत एका स्थानिक मंदिरात गायिका सुद्धा होत्या. आणि ज्याप्रमाणे प्रत्येक मुलाला आपल्या आईची जवळीक असते तसे त्यांनाही त्यांच्या आईच्या जवळ राहायला जास्त आवडायचे. सुरुवातीला रामानुजन कुम्भकोणम या गावी आपल्या परीवारासोबत राहायचे.

त्यांचे प्राथमिक शिक्षण हे कुम्भकोणम या गावामध्येच झाले, आणि त्यांना सुरुवाती पासून गणिताची आवड असल्याने बाकी इतर विषयांमध्ये रुची निर्माण झालीच नाही, ते शाळेत असताना त्यांच्या घरी काही पदवीचे मुले भाडेकरू म्हणून राहत असत. आणि रामानुजन गणितात एवढे तरबेज होते कि ते सातवीत असतानाच पदवीच्या त्या मुलांना गणित शिकवत असत. यावरून आपण समजू शकतो कि रामानुजन नावाच्या या गणितज्ञा मध्ये किती मोठी प्रतिभा लपलेली होती.

रामानुजन यांना गणित आणि इंग्रजी या दोन विषयांची विशेष आवड होती, सुरुवातीला त्यांना त्यांच्या अलौकिक प्रतिभेमुळे शिष्यवृत्ती मिळाली, रामानुजन गणितामध्ये एवढे मग्न झाले होते कि त्यांनी इतर विषयांकडे लक्षच दिले नाही, रामानुजन यामुळे 12 वी मध्ये नापास झाले. आणि त्यांना मिळणारी शिष्यवृत्ती सुद्धा बंद झाली.

त्यानंतर त्यांच्या शिक्षणाचे दरवाजे बंद झाले, आता ते बेरोजगार झाले होते कारण त्यांच्याकडे आता कोणतेही काम नव्हते, आणि हा काळ त्यांच्या साठी खूप कठीण काळ होता या कठीण काळात त्यांच्याकडे त्यांच्या गणिता शिवाय कोणतीही गोष्ट नव्हती,

त्यांना या कठीण काळात खूप काही सहन करावे लागले, जसे लोकांजवळ त्यांना पैशांची भिक सुद्धा मागावी लागली, रस्त्यावरचे कागद सुद्धा उचलून आपला उदरनिर्वाह करावा लागला. त्यांनतर त्यांची तब्येत सुद्धा घसरली. याच दरम्यान 1908 मध्ये त्यांच्या आईने त्यांचे लग्न जानकी नावाच्या एका मुलीशी लावले त्यानंतर त्यांच्यावर आणखी एक जबाबदारी येऊन पडली होती,

आता त्यांना काम शोधणे अनिवार्य झाले होते, तेव्हा त्यांनी मद्रास मध्ये जाऊन पुन्हा नोकरी मिळण्यासाठी प्रयत्न केले, ते कोणाकडे सुद्धा जायचे तेव्हा त्यांनी सोडविलेले गणिते ते लोकांना दाखवत असत, पण कोणीही त्या गणितांना न समजता त्यांना नकारात असे, पण खूप दिवसांच्या मेहनतीनंतर एक दिवस त्यांची भेट तेथील डिप्टी कलेक्टर श्री व्ही. रामास्वामी अय्यर यांच्याशी झाली, ते गणितामध्ये पारंगत होते,

जेव्हा त्यांनी रामानुजन यांनी सोडविलेली गणिते पाहिली तेव्हा त्यांनी ओळखले कि हि व्यक्ती एक प्रतिभावान व्यक्ती आहे, आणि त्यांनी रामानुजन यांना कामावर ठेवून घेतले 25 रुपये महिन्याच्या पगाराने.

येथून रामानुजन यांचे संपूर्ण आयुष्याला एक वेगळं वळण मिळाल, त्यानंतर त्यांनी या मासिक वेतनामधून पुन्हा आपल्या शिक्षणाची वाटचाल सुरु केली. एक वर्ष मद्रास मध्ये राहून त्यांनी स्वत:चे एक शोध पत्र प्रकाशित केले, त्या प्रकाशित केलेल्या शोधपत्रकाचे नाव होते, “जर्नल ऑफ इंडियन मॅथेमेटिकल सोसाइटी असे होते.”

या शोधपत्रकामुळे त्यांना प्रसिद्धी मिळाली, आणि 1912 मध्ये त्यांना रामचंद्र राव यांच्या ओळखीमुळे त्यांना मद्रास पोर्ट ट्रस्ट मध्ये एक क्लर्क ची नोकरी मिळाली. तेच काही दिवसांनतर सुत्र प्राध्यापक सेशू अय्यर यांनी रामानुजन यांना केंब्रिज येथील प्रसिद्ध गणिताचे प्राध्यापक जीएच हार्डी यांना पत्र पाठविण्याचे सुचवले.

त्यानंतर रामानुजन यांनी त्यांचे सर्व प्रमेय एका पत्रात लिहून त्यांना पाठविले, आणि जीएच हार्डी यांना ते एवढे आवडले कि त्यांनी रामानुजन यांना लगेच त्यांच्याकडे बोलावून घेतले. तेथे गेल्यावर जीएच हार्डी यांनी त्यांच्या शिक्षणचा खर्च उचलला.

1916 मध्ये रामानुजन यांनी बीएस्सी ची पदवी पूर्ण केली. इंग्लंड ला जीएच हार्डी आणि रामानुजन हे सर्वांच्या चर्चेचा विषय बनले. आणि जीएच हार्डी यांनी रामानुजन यांच्या जवळून खूप काही नवीन शिकायला मिळाले असे वक्तव्य सुद्धा केले होते.

## रामानुजन यांचे शेवटचे दिवस –

1917 आले आणि रामानुजन यांना इंग्लंड मधील हवामान भावले नाही आणि त्यांची तब्येतीमध्ये बिघाड झाली, आणि विशेष म्हणजे तेव्हा इंग्लंड पहिल्या महायुद्धामध्ये सहभागी असल्यामुळे इंग्लंड ला अन्नाचा तुटवडा पडला होता, आणि रामानुजन हे ब्राम्हण परिवाराचे असल्यामुळे ते शाकाहारी होते, आणि तेथे शाकाहारी अन्नाचा तुटवडा असल्यामुळे त्यांची तब्येत आणखी खालावली, ते याच दरम्यान भारतामध्ये परत आले. रामानुजन शेवटच्या दिवसांमध्ये अंथरुणावरच पडलेले होते, खूप उपचारानंतर सुद्धा त्यांच्यात काही बदल दिसून आला नाही, त्यानंतर 26 एप्रिल 1920 ला रामानुजन यांचे निधन झाले.

त्यांनी अंथरुणावर असताना 600 परिणाम लिहिले होते, हे परिणाम सुरुवातिला मद्रासच्या विश्व विद्यालयात होते, त्यानंतर ट्रिनिटी कॉलेज च्या ग्रंथालयात यांना जमा केले गेले. याआधीही रामानुजन यांनी 3500 पेक्षाही जास्त गणिताची प्रमेय लिहिलेली होती. आणि त्यांना टाटा इंस्टीट्यूट ऑफ फंडामेंटल रिसर्च यांनी प्रकाशित केले.

त्यावर 20 वर्षापर्यंत इलिनॉय विद्यापीठाचे गणितज्ञ ब्रूस सी ब्रेंड्ट यांनी रिसर्च करून एक पुस्तक प्रकाशित केले आणि हे पुस्तक त्यांनी पाच वेगवेगळ्या खंडांमध्ये प्रकाशित केले आहे.
अश्या महान व्यक्तीच्या जीवनावर एक चित्रपट सुद्धा निघालेला आहे, त्या चित्रपटाचे नाव “The Man Who Knew Infinity” असे आहे.